तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी : 2620601,2690602,2641150/51 फॅक्स . 2692102,269007
तार : EDUTECH E-mail:- desk9@dtemaharashtra.gov.in Web:-
http://www.dtemaharashtra.gov.in

**तातडीचे/महत्वाचे** Speed post

क्रमांक – 9(2)/सुदृढ भारत/2019/२८९
दिनांक– २८/०८/२०१९

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद
अमरावती व नागपूर

विषय- मा.प्रधानमंत्री यांच्याव्दारे दि.29-8-2019 रोजी होणा-या "सुदृढ भारत" (FIT India) अभियान बाबत कार्यवाही करणे..

संदर्भ -1) शासन पत्र क्र.रासेयो-2019/प्र.क्र.115/साशि-7 दि.23-8-2019

---

संदर्भीय शासन पत्रान्वये शासनाने कळविण्यानुसार मा.प्रधानमंत्री, भारत सरकार यांच्याव्दारे दि.29-8-2019 रोजी सकाळी 10.00 वाजता होणा-या सुदृढ भारत (FIT India) अभियानाबाबत आपल्या विभागातील सर्व महाविद्यालये/तंत्रनिकेतने व संस्थांना कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात यावे. (सोबत प्रत जोडत आहे) व त्याचा कार्योत्तर अहवाल या संचालनालयास त्वरीत सादर करण्यात यावा.

(डॉ.सुरेश यावलकर)
प्र.सहसंचालक,तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१९/२८४०
दिनांक. - 9 SEP 2019

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अनुदानीत विना अनुदानीत सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था
औरंगाबाद विभाग

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या उपरोक्त पत्रानुसार शासनाचे पत्र दि.२३-०८-२०१९ च्या पत्रासोबत सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय तसेच सचिव, युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांनी सुदृढ भारत (Fit India) अभियानात सहभाग नोंदविण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : रासेयो २०१९/प्र.क्र. ११५/१९/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- २३ ऑगस्ट, २०१९.

तातडीचे / महत्वाचे

प्रति,

१. मा. संचालक,
उच्च शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. मा. संचालक,
तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. राज्य संपर्क अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष, मुंबई

विषय :- मा. प्रधानमंत्री यांच्याद्वारे दि.२९.०८.२०१९ रोजी होणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) अभियाना बाबत कार्यवांही करणे...

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग/साशि-७ यांनी सादर केलेल्या टिपणीवरील मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे निर्देश.

महोदय,

मा. प्रधानमंत्री, भारत सरकार यांच्याद्वारे दिनांक २९.०८.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता होणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) अभियाना बाबत मा. केंद्रीय मंत्री, युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली दि. २३.०९.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजीत केलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये दिलेल्या सूचनांनुसार विभागाने कार्यवाही करावी, यासाठी मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या मान्यतेनुसार टिपणी सोबत जोडली असून त्यामधील सूचनांनुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे व त्याचा कार्योत्तर अहवाल मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना अवगत करावा.

आपला विश्वासू,

(डॉ. अतुल हं. साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष.

त्वरीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात [illegible]
कार्यवाही
26/8

सहायक कार्यक्रम सल्लागार, भारत सरकार, युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. पी.३२.१/एनएसएस/डीटीई/२०१९, दिनांक २२.०८.२०१९ च्या ई-मेल पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथील N.I.C. Centre मध्ये दिनांक २३.०८.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता " Fit India Movement" बाबत मा. केंद्रीय मंत्री, युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्स घेण्यात आली.

दि. २९.०८.२०१९ रोजी मा. प्रधानमंत्री, भारत सरकार यांचेकरवी "सुदृढ भारत" ( Fit India ) ची सुरुवात होणार असून, सदरचा कार्यक्रम दूरदर्शन वाहिनीवर लाईव्ह प्रसारण होणार असून, मा. प्रधानमंत्री यांच्या सोबत सामुहिकरित्या शपथ देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने दिनांक २९.०८.२०१९ रोजी होणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) चे संपूर्ण भारतातील सर्व राज्यांमध्ये, जिल्हयांमध्ये, तालुका तसेच गाव पातळीवरील शाळा, कनिष्ठ महाविदयालये, महाविदयालये, शासकीय संस्था, कार्यालये इत्यादी ठिकाणी याचे आयोजन करावयाचे असून सदर कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

दिनांक २९ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय खेळ दिवस, तसेच प्रख्यात हॉकीपटू श्री. ध्यानचंद यांचा जन्मदिवस म्हणून देखील साजरा होत असतो. या दिवसाचे औचित्य साधून देशातील सर्व नागरीक शारिरिकदृष्टया निरोगी, तंदुरुस्त तसेच स्वस्थ्य राहण्याकरीता चालणे, फिरणे, खेळ, व्यायाम, योग व प्राणायम करणे इत्यादीप्रकारे स्वत:ला निरोगी व आरोग्यदायी राहण्यास प्रयत्नशील रहावे व देशाला सुदृढ भारत बनविण्याकरीता सहकार्य करावे.

दि.२९.०८.२०१९ रोजी मा. प्रधानमंत्री, भारत सरकार हे स्वत: सकाळी १०:०० वाजता या कार्यक्रमाची सुरुवात करतील. तसेच संपूर्ण देशभरातील दूरदर्शन वाहिनीद्वारे याचे थेट प्रसारण करण्यात येणार असून मा.प्रधानमंत्री यांचे सोबत "सुदृढ भारत" ( Fit India ) बाबत शपथ (Pledge) घेतली जाणार आहे. याबाबत सर्व शाळा व महाविदयालय स्तरावर दूरचित्रवाणी संचाची व्यवस्था करुन उपस्थित सर्व विदयार्थ्यांना याचे थेट प्रसारण पाहण्याची व्यवस्था करावी. केवळ एक दिवस नाही तर संपूर्ण वर्षभर प्रत्येकाने स्वत:ला आरोग्यदायी, निरोगी व तंदुरुस्त ठेवण्याकरीता विविधप्रकारे व्यायाम करणे आवश्यक आहे, याचीही शपथ घ्यावी. त्यानुसार आवश्यक ते बॅनर्स, पोस्टर्स, फलक यांच्याद्वारे याची प्रसिध्दी करण्यात यावी. या चळवळीनिमित्त एक विशिष्ट लोगो दिनांक २६.०८.२०१९ रोजी निश्चीत करण्यात येणार असून तो सर्वांना कळविण्यात येईल, असे सांगण्यात आले.

तरी दिनांक २९.०८.२०१९ रोजी आयोजीत केल्या जाणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) करीता शाळा तसेच महाविदयालयीन स्तरावरुन जास्तीत जास्त विदयार्थ्यांना यामध्ये सहभागी करुन घेण्यात यावे व केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल सादर करण्यात यावा, अशी सूचना सर्व विभागांना देण्यात आली.

वरील सूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय, तसेच सचिव, युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.

१. विदयापीठे, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, स्वायत्त संस्था, निमशासकीय संस्था इत्यादी सर्वांनी आपल्या संस्थेमध्ये दूरचित्रवाणी संच उपलब्ध करुन विदयार्थ्यांना उपस्थित रहाणेबाबत विभागाकडून परिपत्रक निर्गमित करावे. (संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण, राष्ट्रीय सेवा योजना, विदयार्थी विकास मंडळ इत्यादी)

२. महाविदयालयांमध्ये जिमखाना विभाग व जिमनॅशियम क्लब यांचा कृती आराखडा तयार करुन विदयार्थ्यांना अधिकाधिक सुदृढ व निरोगी राहण्यासाठी प्रवृत्त करणे व सुविधा पुरविणे.

३. महाविदयालयांमध्ये विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धांचे तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ व्यक्तींचे व्याख्याने तसेच आरोग्य शिबिरांचे आयोजीत करणे.

४. "युवा जागरुक हो" या मथळयाखाली (Tag line) समाजाला, कुटुंबाला संदेश देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच प्रचार व प्रसार या माध्यमाचा वापर करुन जास्तीत जास्त लोकांमध्ये "सुदृढ भारत" ( Fit India ) साठी जागरुकता निर्माण करणे.

५. युवकांना आपल्या व्यक्तिमत्वाकडे अधिक लक्ष देता यावे, यासाठी योगा, साहसी क्रिडा स्पर्धा, धावण्याच्या शर्यती इ. गोष्टींवर लक्ष केंद्रीत करणे.

६. दि.२९ ऑगस्ट, २०१९ रोजी होणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) अभियानामध्ये प्रत्येक महाविदयालयातील प्रवेशीत विदयार्थी सहभागी होतील यासाठी विभागाने प्रयत्न करणे.

तरी वरीलप्रमाणे सूचना संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण, राष्ट्रीय सेवा योजना यांना देण्याकरीता मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर सदरची टिपणी उक्त विभागांना स्वतंत्रपणे या कार्यालयामार्फत पाठविण्यात येईल.

23/8/2019

राज्य संपर्क अधिकारी

उप सचिव (साशि-७) 23/8

May also inform Hon. Min.

मा. सचिव (उवतंशिवि) 23-8

1454
23/8/19

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण)